

गुढीपाडव्यानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन!


# खबर से हकीकत तक

website : https://khabarsehakikattak.in

KHABAR SE HAKIKAT TAK






Email : shirishkumarsherkhane@gmail.com | संपादक : शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो.९०४९८४४४१२ | कार्यकारी संपादक : ॲड.चंद्रशेखर धोत्रे, मुंबई



लातूर | मराठी | साप्ताहिक | वर्ष १ ले. | अंक ४४ वा. | सोमवार दि. ०८ ते १४ एप्रिल २०२४ | RNI No. : MAHMAR/2023/86200 | किंमत २ रूपये | पाने : ४


## संबंधासाठी विचारपुर्वक सहमतीला गैरसमज म्हणता येणार नाही : दिल्ली हायकोर्ट

नवी दिल्ली : एखादी महिला विचारपूर्वक सहमतीने एखाद्या पुरुषासोबत शारीरिक संबंध ठेवत असेल. तर अशा वेळी जोपर्यंत लग्नाच्या खोट्या आश्वासनाचे ठोस पुरावे मिळत नाहीत, तोपर्यंत तिची सहमती गैरसमजुतीवर आधारित असल्याचे मानता येणार नाही, असे महत्त्वाचे निरीक्षण दिल्ली उच्च न्यायालयाने एका व्यक्तीविरोधातील लैंगिक अत्याचाराचा गुन्हा रद्द करताना नोंदवले.





न्यायमूर्ती अनुप कुमार मेंदीरत्ता यांनी हे प्रकरण निकाली काढताना याचिकाकर्ता पुरुष आणि महिलेदरम्यान सौहार्दपणे प्रकरण सुटले असून, त्यांनी एकमेकांशी विवाह केल्याचे नमूद केले. एखादी महिला अशा कृत्याच्या परिणामाची पूर्ण जाणीव असताना एखाद्या पुरुषासोबत शारीरिक संबंध प्रस्थापित करत असेल, तर अशा स्थितीत तिची सहमती गैरसमजुतीवर आधारित असल्याचे तोपर्यंत मानता येणार नाही जोपर्यंत पुरुषाने लग्न करण्यासंबंधी खोटे आश्वासन दिल्याचे ठोस पुरावे मिळत नाहीत, असे मत न्यायमूर्तींनी व्यक्त केले. या प्रकरणात महिलेने पुरुषाविरोधात लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल केला होता.

व्यक्तीने लग्नाचे आश्वासन देत वारंवार आपल्यासोबत शारीरिक संबंध ठेवले; परंतु नंतर कुटुंबाने आपले लग्न दुसरीकडे ठरवल्याचे सांगत आपल्यासोबत लग्नास नकार दिल्याचा आरोप महिलेने केला होता. प्रकरण सुरू असताना नंतर या दोघांनी वाद मिटवून घेत एकमेकांशी विवाह केल्याची माहिती न्यायालयास दिली. संबंधित व्यक्तीसोबत मी आनंदाने राहत असून या प्रकरणात आपल्याला पुढे जायचे नसल्याचे महिलेने न्यायालयात सांगितले. प्रकरणाचा तपास सुरु असताना पुरुषाने स्वेच्छेने महिलेसोबत विवाह केला होता. त्यामुळे पुरुषाने सुरुवातीला दिलेले आश्वासन हे पूर्ण न करण्याच्या हेतूने दिले होते, असे मानता येणार नसल्याचे न्यायालयाने म्हटले. तसेच याप्रकरणात पुढील कारवाई बंद केल्यास दोन्ही पक्षांमधील वैवाहिक संबंध चांगले होतील, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## मोदींच्या फोनमुळे रशिया-युक्रेन युद्ध थांबले

### राजनाथ सिंह यांचे प्रतिपादन



बिकानेर : लोकसभा निवडणूक जवळ आली आहे, त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेते विविध भागात प्रचार सभा घेत आहेत. तिस-यांदा सत्तेत येण्यासाठी भाजप जोरदार प्रयत्न करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून ते सर्वच बडे नेते पूर्ण ताकदीने प्रचार करत आहेत. अशातच केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी राजस्थानच्या बिकानेरमध्ये सभा घेतली. यावेळी त्यांनी विरोधकांवर टीका करण्यासोबतच मोदी सरकारच्या कामाचाही पाढा वाचला.

राज्यातील मागील सरकारवर टीका करताना राजनाथ सिंह म्हणाले की, काँग्रेस सरकारमध्ये कायदा आणि सुव्यवस्था राहिली नव्हती. घरात घुसून लोकांचे गळे कापण्यात आले, लोकांना मारण्यात आले. परंतु आता भजनलाल सरकारने (पान २ वर)

## आता लोकसभा निवडणुकीत निर्णायक ठरणार महिला शक्ती!

मुंबई : पाच टप्प्यात होणाऱ्या आगामी लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांचे भवितव्य ठरविण्यात यंदा महिला मतदारांचा महत्वाचा वाटा असेल. कारण २००४, २००९, २०१४, आणि २०१९ च्या तुलनेपेक्षा २०२४ मध्ये महिला मतदारांची संख्या वाढली आहे. २००४ मध्ये पुरुष आणि महिला मतदार अशी स्वतंत्र नोंदणी करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे त्यावर्षी एकूण ३ कोटी ४२ लाख ६३ हजार ३१७ मतदारांची नोंदणी झाली. २००९ आणि २०१४ या दोन्ही लोकसभा



संग्रहीत छायाचित्र

निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या मतदार नोंदणीमध्ये महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा कमी होती. मात्र २०१९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या मतदार नोंदणीत महिला मतदारांची संख्या वाढली आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार १ हजार पुरुषांमागे ९२५ महिला असे प्रमाण होते. सन २०१४ मध्ये मतदार यादीतील महिलांचे प्रमाण १ हजार पुरुषांमागे ८८९ महिला इतके होते. सन २०१९ मध्ये १ हजार पुरुषांमागे ९११ महिला असे प्रमाण होते. २०२४ मध्ये १ हजार पुरुषांमागे ९२३ महिला अशी लक्षणीय (पान २ वर)

## भाजपाचा निलंगा विधानसभा क्षेत्रातील बूथ प्रमुखांचा मेळावा संपन्न




निलंगा - माकणी (थोर) येथील सुप्रसिद्ध हनुमान मंदिरात श्री बलभीम मारुतीरायाची आरती करून प्रचाराचे श्रीफळ वाढवण्यात आले. भारतीय जनता पक्षाच्या उदंड यशाची कामना करून मारुतीरायाचे दर्शन घेतले.

महाविजय २०२४ या मोहिमेचा श्रीगणेशा केला. या वेळी देवस्थान कमिटीकडून उपस्थिताचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सोबतच आगामी लोकसभा निवडणुकीच्या नियोजनाविषयी निलंगा विधानसभा मतदारसंघातील बूथ प्रमुखांचा मेळावा आज उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

याप्रसंगी माजी मंत्री तथा आमदार संभाजीभैय्या पाटील निलंगेकर, डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर, प्रदेश सचिव अरविंदजी पाटील निलंगेकर, सरचिटणीस संजयजी दोरवे, सरचिटणीस भारत भाऊ चामे, ॲड. संभाजी पाटील, विधानसभा निवडणूक प्रमुख दगडू साळुंखे, जयश्रीताई पाटील, निलंगा तालुका भाजपा अध्यक्ष कुमुद लोभे, शिरूर अनंतपाळ तालुका भाजपा अध्यक्ष मंगेश पाटील, देवणी तालुका भाजपा अध्यक्ष काशिनाथ गरिबे, लोकसभेचे विस्तारक सिद्धेश्वरजी पवार, जिल्हा उपाध्यक्ष शेषराव ममाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य व्यंकट धुमाळ यांच्यासह बूथप्रमुख व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शेतकरी, मजूर, आणि युवकांचे भविष्य घडवण्यासाठी महाविकास आघाडीला साथ द्यावी-माजी मंत्री आ.देशमुख

### लातुर लोकसभेचे महाविकास आघाडी काँग्रेसचे उमेदवार डॉ.शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ साई येथे सुसंवाद बैठक



लातुर : देशात काँग्रेस महाविकास आघाडीचे सरकार आल्या सर्वसामान्य माणसांचे सरकार येणार आहे. यामुळे शेतकरी, मजूर, आणि युवकांचे भविष्य घडवण्यासाठी महाविकास आघाडीला साथ देण्याच्या आवाहन करून डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड मतांनी निवडून देत दिल्लीत पाठवावे असे आवाहन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले. लातुर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ साई येथे अमोल पवार यांच्या निवासस्थानी, वरवंटी येथे पवन जाधव यांच्या निवासस्थानी तर श्याम नगर (१२ नंबर पाटी) येथे व्यंकट जाधव यांच्या निवासस्थानी रविवार दि. ७ एप्रिल रोजी सायंकाळी सुसंवाद बैठक पार पडली, सुसंवाद बैठकीला त्या त्या गावातील नागरीकांसह परिसरातील नागरीक, युवक, महिला भगिनी मोठया संख्येने उपस्थिती होत्या या प्रसंगी ते बोलत होते. या बैठकीस लातुर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष किरण जाधव, निरीक्षक सर्जेराव मोरे, सेवादल अध्यक्ष रमेश सुर्यवंशी, तालुकाध्यक्ष सुभाष घोडके आदी उपस्थित होते.

### डॉ शिवाजी काळगे यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचा साई ग्रामस्थांचा निर्धार

#### आपल्या कामासाठी आपल्या हक्काचा माणूस आपल्याला मिळणार

यावेळी बोलताना किरण जाधव म्हणाले की, महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून डॉ. शिवाजी काळगे यांना उमेदवारी दिली असून आपल्या प्रश्नांची उकल करणारे खासदार आपल्याला हवे की मग साईकडे खासदार असताना लक्ष न देणारे खासदार हवे हे आपण ठरवावे. डॉ. शिवाजी काळगे यांना निवडून दिल्यास आपल्या कामासाठी आपल्या हक्काचा माणूस आपल्याला मिळणार आहे. यावेळी महिला भगिनी व युवकांनी या संवाद फेरीचे उस्फुर्त स्वागत केले, डॉ शिवाजी काळगे यांना भरभरून मतदान करण्याचे आश्वासन यावेळी दिले.

लातुर लोकसभेचे महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचार प्रचारार्थ पार पडलेल्या या संवाद बैठकीस गावातील नागरीकांसह परिसरातील नागरीक, युवक, जेष्ठ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्वांनी डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड मतांनी निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख साई येथे बोलताना म्हणाले की, ग्रामस्थांनी डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड मतांनी निवडून देत दिल्लीत पाठवावे असे आवाहन त्यांनी केले. साई गावातील नागरिकांनी माजी मंत्री (पान २ वर)

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयमध्ये १९ एप्रिलला चौथ्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन

लातूर : महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील एमसीव्हीसी सभागृहात शुक्रवार दि. १९ एप्रिल २०२४ रोजी स. १० वा. चौथ्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर अप्पा मल्लिकार्जुन अप्पा बिडवे हे भूषविणार असून प्रमुख



अतिथी म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ.घन:श्याम येळणे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

यावेळी विचारमंचावर शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक ॲड.श्रीकांत अप्पा उटगे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, परीक्षा प्रमुख तथा उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ.बाळासाहेब (पान २ वर)

## बबनराव घोलप यांचा शिंदे गटात प्रवेश

मुंबई : शिर्डी या राखीव लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळवण्यास इच्छुक असलेले शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षाचे नेते व माजी मंत्री बबनराव घोलप यांनी शनिवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावरच घोलप यांनी ठाकरे यांच्या पक्षाला हा धक्का मानला जात आहे. बबनराव घोलप हे नाशिक जिल्ह्यातील देवळाली विधानसभा मतदार संघातून तब्बल पाच वेळा विधानसभेवर निवडून आले होते. समाजकल्याण मंत्री म्हणून त्यांनी काम केले आहे. मागील अनेक वर्षांपासून घोलप सत्तेच्या



राजकारणापासून दूर आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीत त्यांना शिर्डी राखीव (पान २ वर)











## लोकशाही संवर्धनासाठी गुलामगीरी नष्ट करा; विचारवंताच्या संवादी आत्मचिंतनाचा सूर!

लातूर : लोकशाही स्वातंत्र्याच्या संवर्धनासाठी हुकूमशाहीतील गुलामी नष्ट करावी, असा सामूहिक सूर विचारवंताच्या संवादी सामूहिक आत्मचिंतनातून निघाला. ४ एप्रिल रोजी संध्याकाळी ७ वाजता लातूर येथील सूतमील रोड परिसरामध्ये, मुप्टाच्यावतीने प्रा. सुभाष भिंगे यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील कांही बुद्धीवंत व कार्यकर्त्यांच्या एका संवादी आत्मचिंतनाचे आयोजन करण्यात आले होते. विचार मंचावर महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, प्रसिद्ध विचारवंत प्रा. डॉ. अशोक नारनवरे, प्रा. अर्जून जाधव व प्रा. डॉ. मा. ना. गायकवाड यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी बोलताना महाराष्ट्र अंनिसचे राज्यकार्याध्यक्ष साथी माधव बावगे हे म्हणाले की, आपल्या विचार आणि कर्तव्याप्रती जशी जागरुकता असावयास हवी असते, तव्दतच त्याच्या प्रत्यक्ष कृती संबंधी प्रामाणिकताही बाळगावयास हवी. त्याच बरोबर स्वातंत्र्याच्या उद्घोषासाठी निष्ठा व निर्भयताही अगत्याची असते. तर प्रा. अर्जून जाधव हे म्हणाले की, विचारवंत आणि कार्यकर्त्यांनी आपल्या कार्यनिष्ठ बांधिलकीसह, ज्ञान आणि व्यवहाराचा सातत्याने लेखा-जोखा ठेवला पाहिजे.

### 'स्व-भूमिकेवरच परिवर्तनाचे भविष्य ठरते!'- प्रा. डॉ. अशोक नारनवरे

यावेळी बोलतांना प्रसिद्ध विचारवंत प्रा. डॉ. अशोक नारनवरे हे



म्हणाले की, आपण कोणत्या वेळी नेमकी काय भूमिका घेतोत हे अत्यंत महत्वाचे असून, अशा आपल्या निश्चित भूमिकेवरच, येथील परिवर्तन अथवा स्थित्यंतराचे भवितव्य अवलबूंन असते. भूमिका नसलेला विचार आणि कृती ही दुबळी आणि अधू असते. भूमिकेविना लक्ष किंवा यश साध्य होत नसते. आपल्या विचार प्रेरणांशी आपण कायम प्रामाणिक असावयास हवे. दुस-या जागतिक महायुद्धानंतर, झोटिंगशाही विरुद्ध लोकशाही अशी आपली लढाई असल्याचे खुद्द डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट करून, आपल्या लेख आणि अग्रलेखातून त्याचे सविस्तर विवेचन केले होते. त्यावेळी स्वातंत्र्य लढ्यातील आपले अनेक राष्ट्रीय नेते व क्रांतिकारक हे गोंधळून गेले होते. मात्र डॉ. पंजाबराव देशमुख यांनी, डॉ. बाबासाहेबांच्या या अंतरराष्ट्रीय वैचारिक भूमिकेचे, अगदी जाहीर समर्थन करुन, त्यांनी त्या काळी आपले १० हजार मराठा लिग सैनिक तयार करून, ते पूर्णपणे सक्रिय केले होते असेही प्रा.डॉ. अशोक नारनवरे म्हणाले. यावेळी प्रा. सुभाष भिंगे यांच्यासह प्रा. डॉ. मा ना गायकवाड, के टी कांबळे, प्रा. बाबासाहेब कांबळे, प्रा. मकबूल शेख, प्रा. सुधीर अनवले यांची अभ्यासपूर्ण मनोगतं झाली.

प्रारंभी ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. अशोक नारनवरे व प्रसिद्ध वक्त्या प्रा. डॉ. सुशीला पिंपळे यांना मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व विचारशलाकाचा ' भारतीय लोकशाही आव्हाने व भविष्य ' या प्रमुख विषयावरील चालू विशेषांक देऊन, त्यांचा गौरव करून ऋद्य सदिच्छाही देण्यात आल्या. या समूह संवादी आत्मचिंतनाचे प्रास्ताविक नरसिंग घोडके यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. बलभीम सातपुते तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे यांनी केले. या प्रसंगी यु. डी. गायकवाड, प्राचार्य प्रा. डॉ. दुष्यंत कठारे, (पान २ वर)

## सोळावे पुण्यस्मरण



**कै.शंकरराव धोंडीबा शेरखाने**

मृत्यू दि.०२-०४-२००८

सहवास जरी सुटला असला तुमचा बाबा
तरी सुगंध तुमचा स्मृती देत राहील
जीवनाच्या प्रत्येक वळणावर
आठवण तुमची येत राहील
तुमच्या आत्म्यास शांती लाभो
याच आपण या सोळाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त

**भावपूर्ण आदरांजली...!**

शोकाकुल

समस्त शेरखाने परिवार, लातूर

# मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर

## मतदान केंद्रावर नियुक्त कर्मचाऱ्यांचे प्रथम प्रशिक्षण

## भारत निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार कामकाज करण्याचे निर्देश

लातूर : लोकशाहीमध्ये निवडणूक प्रक्रियेला अतिशय महत्व असून ही निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पडण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. यामध्ये मतदान केंद्रावर नियुक्त केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी यांची भूमिका महत्वाची असून सर्वांनी पारदर्शक, निःपक्षपाती काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या.



दयानंद सभागृह येथे आयोजित मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आलेल्या लातूर शहर विधानसभा क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी यांचे प्रथम प्रशिक्षण कार्यक्रमात श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, लातूरच्या उपविभागीय अधिकारी तथा लातूर शहर विधानसभा मतदारसंघाच्या सहायक निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, गट विकास अधिकारी तुकाराम भालके, नायब तहसीलदार पंकज मांदाडे, श्री. बरुरे, गणेश सरोदे यावेळी उपस्थित होते.

निवडणूक प्रक्रियेत सहभागी होवून देशासाठी महत्वपूर्ण कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी आपल्याला मिळाली असून सर्वांनी अतिशय काळजीपूर्वक आणि सजग राहून ही जबाबदारी पार पाडावी. यामध्ये कोणत्याही प्रकारची चूक अथवा हयगय होणार नाही, याची दक्षता घ्यावी. निवडणुकीत प्रत्येक बाबीसाठी भारत निवडणूक आयोगाने सुस्पष्ट सूचना निर्गमित केल्या असून आपल्या जबाबदारीशी संबंधित सूचनांचे अवलोकन आणि आकलन करून घेवून प्रत्येकाने काम करावे. एखादी बाब लक्षात न आल्यास संबंधित प्रशिक्षकांना विचारून त्याचे निराकरण करून घ्यावे.

कोणत्याही परिस्थितीत मतदानादिवशी चूक होवू नये, कोणतीही नोंद राहून जावू नये, तसेच मतदान यंत्र जोडणी, मॉकपोलची प्रक्रिया सुरळीत पार पडावी, याची सर्वांनी काळजी घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. मॉकपोल, अत्यावश्यक सेवेतील मतदारांचे मतदान, तसेच मतदान केंद्रावरील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी भरून द्यावयाचे विहित नमुन्यातील अहवाल अचूक राहतील याबाबत काळजी घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. मतदान केंद्रावर नियुक्त कर्मचारी यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडून मतदान प्रक्रियेत कोणताही अडथळा येणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना उपविभागीय अधिकारी श्रीमती नऱ्हे-विरोळे यांनी दिल्या. तसेच अभिरूप मतदान केंद्र आणि पीपीटीद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच तहसीलदार सौदागर तांदळे, नायब तहसीलदार गणेश सरोदे, नायब तहसीलदार भीमाशंकर बेरुळे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. याठिकाणी उभारण्यात आलेले प्रारूप मतदान केंद्र, मतदान केंद्रावर द्यावयाच्या सुविधा, मतदार जागृतीसाठी उभारण्यात आलेला सेल्फी पॉईंट आदी बाबींची जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी पाहणी केली.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश

लातूर - राष्ट्रसेवेसाठी समर्पित भारतीय जनता पार्टी स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी आज लातूर शहर कार्यालय गांधी चौक, लातूर शहरातील बूथ क्रमांक २९०/२९१, प्रभाग क्रमांक १४ मधील बूथ क्रमांक २७०, प्रभाग क्रमांक १२ मधील बूथ क्रमांक २८९ ते २९३, प्रभाग ८ मधील बूथ क्रमांक १६० येथे साजरा केला. भारतीय जनता पार्टीने दिलेला संघर्षाचा वारसा व विचारांचा वसा पुढे नेण्याचा दृढसंकल्प या वेळी महायुतीचे उमेदवार श्री. सुधाकर शृंगारे यांनी व्यक्त केला. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी शहर उपाध्यक्ष श्री. दत्ता जाधव व माजी विभाग अध्यक्ष श्री. गोविंद जाधव यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केल्यामुळे त्यांचे भारतीय जनता पक्षाच्या वतीने स्वागत करण्यात आले.



याप्रसंगी भाजपा लातूर शहर अध्यक्ष श्री. देविदासजी काळे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य श्री. शैलेशभैय्या लाहोटी, श्री. गुरुनाथ मगे, भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष श्री. गणेश गोमचाळे, श्री. संजय सोनकांबळे, श्री. प्रमोद गुडे, श्री. संतोष तिवारी, श्री. वैभव वनारसे, श्री. गजेंद्र बोकन माजी नगरसेविका श्रीमती दीपाताई गीते, श्रीमती स्वातीताई घोरपडे, श्री. विवेकजी बाजपेयी, श्री शिवसिंग सिसोदिया, मंडळ अध्यक्ष श्री. अमोल जिरे, श्री. प्रदीप मोरे, माजी नगरसेविका श्रीमती कोमलताई, मंडल अध्यक्ष श्री. अमोल गीते, माजी नगरसेवक श्री. दयानंद साळुंके, मंडळ अध्यक्ष श्री. चंद्रकांत खटके, श्रीमती शशिकलाताई गोमचाळे, मंडल अध्यक्ष श्री. अमोल गीते, माजी नगरसेवक श्री. दयानंद साळुंके, मंडळ अध्यक्ष श्री. चंद्रकांत खटके, बूथ प्रमुख श्री. धनराज जाधव, श्री. अनंत मेगशेट्टे, श्री.अरविंद बारस्कर, श्री. सुमित सुरवसे, श्री. गणेश छत्रे, श्री. धीरज हालकुडे, मंडल सरचिटणीस श्री. अभिजीत मुनाळे, सुपर वॉरियर्स नगरसेवक श्री. शैलेश स्वामी, श्री. व्यंकट वाघमारे, श्री.महेश आप्पा कोळखरे, जैन प्रकोष्ठच्या श्रीमती शोभाताई कोंडेकर, रेल्वे सल्लागार समिती सदस्य श्री. शामसुंदर मानधना, सिद्धेश्वर मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष श्री. अक्षय पतंगे, श्री. जगदीश मलंग, युवा मोर्चा सरचिटणीस श्री. गजेंद्र बोकन, श्री. जयप्रकाश मंत्री आदींसह अनेक पदाधिकारी, बूथ प्रमुख, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये रंगोत्सव स्पर्धेचे बक्षीस वितरण

लातूर - शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये आज इंटरनॅशनल लेव्हल रंगोत्सव कला स्पर्धेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लंडन येथील सुप्रसिध्द डॉक्टर वैशाली पाटील या होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लातूर कलाध्यापक संघाचे अध्यक्ष अशोक तोगरे, शारदा सेमी इंग्लिश स्कूलचे प्राचार्य लक्ष्मण पुरी, कलाशिक्षिका प्रियल गोखले उपस्थित होते.




प्रारंभी दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. रेणुका समुद्रे आणि उषा गुडदे यांनी स्वागतगीत सादर केले. या स्पर्धेत इयत्ता चौथीमधील श्रावणी विवेकानंद आर्य हिला द्वितीय पुरस्कार मिळाला. तिला अलेक्सा, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र मिळाले. इयत्ता तिसरीतील रचना लक्ष्मीकांत मोरे व इयत्ता सातवीतील गौरवी अरुण धाराशिवे या दोन विद्यार्थिनींना इंटरनॅशनल आर्ट मेरिट अवॉर्ड मिळाल्याने सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

इयत्ता पहिलीतील वेदांती वीरनाथ औरादे, इयत्ता दुसरीतील अर्पिता अशोक ननवरे, आर्या अमोल काळकुटे, रुद्रानी राम सुडे, संबोधी यशपाल सितापे, इयत्ता तिसरीमधील विराज अजय चव्हाण, पार्थ राहुल सुतार, इयत्ता पाचवीतील ओम प्रमोद पवार, शौर्य अरुण धाराशिवे, इयत्ता सातवीतील मयूर योगेश महामुनी, इयत्ता नववीमधील श्रुती श्रीकांत केंद्रे यांना इंटरनॅशनल मेडल व प्रमाणपत्र मिळाले. इयत्ता पाचवीमधील श्रुती सचिन गाडे, रुद्रानी गंगाधर पाचेगावकर, अनस सादिक पिरजादे व इयत्ता सातवीमधील यश भीमराव लहाने या चार विद्यार्थ्यांना कॉन्सोलेशन प्राईज मिळाले आहे. स्पर्धेच्या आयोजकांकडून शाळेला ग्लोबल स्कूल अवॉर्ड मिळाले आहे. प्राचार्य पुरी यांना वर्ल्ड वाईड हायेस्ट परफॉर्मन्स अवॉर्ड तर कला शिक्षिका प्रियल गोखले यांना साल्वोदार दाली हा अवॉर्ड मिळाले आहे. यावेळी डॉ. वैशाली पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन प्राथमिक वर्गाच्या समन्वयक अश्विनी पवार यांनी तर प्रास्ताविक लिंबराज गायकवाड यांनी केले. शीतल नडगिरे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी शिक्षक, विद्यार्थी, पालक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जनतेसाठी २४ तास ३६५ दिवस ५ वर्ष उपलब्ध राहणारे व्यक्तिमत्त्व डॉ.शिवाजी काळगे-माजी मंत्री आ.अमित देशमुख

लातूर : काँग्रेसच्या काळातील चांगले दिवस आता पुन्हा आणायचे असतील तर सुशिक्षित, उच्चविद्या विभाषित, संवेदनशील, समाजाशी नाळ जोडलेले असे आपल्याला २४ तास ३६५ दिवस ५ वर्ष उपलब्ध राहणारे व्यक्तिमत्त्व डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड मतांनी निवडून द्यावे, असे आवाहन महाराणा प्रताप नगर (म्हाडा कॉलनी) परिसरातील नागरिकांना करीत सर्वाधिक मताधिक्य बाभळगाव मधून मिळेल, असा विश्वास राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला आहे.




राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकसभा निवडणूक - २०२४ पार्श्वभूमीवर लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ.शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ म्हाडा कॉलनी (महाराणा प्रताप नगर) येथील राम चलवाड यांच्या निवासस्थानी ग्रामस्थांसमवेत सुसंवाद बैठक पार पडली. शुक्रवार दि. ५ एप्रिल रोजी संपन्न झालेल्या या बैठकीसाठी म्हाडा कॉलनी (महाराणा प्रताप नगर) सह सिकंदरपूर, सारोळा, सोनवती, आनंदवाडी येथील ग्रामस्थ, विविध संस्था पदाधिकारी, पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, महाराणा प्रताप नगर हे मूळ गाव बंजारा समाज बहुल गाव तर आहेच यासोबतच आपली उपजीविका भागविण्यासाठी जिल्ह्यातील इतर भागातून आलेले नागरीक देखील येथे मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास आहेत. ज्यामुळे या गावाला स्थलांतरित लोकांचे एक गाव अशी या गावाची ओळख आहे.

आपली उपस्थिती आपला उत्स्फूर्त सहभाग पाहता डॉ. शिवाजी काळगे यांचा विजय निश्चित आहे. आपणास आजवर आमदार निधी मिळत होता, आणि आता खासदार निधी देखील डॉ. शिवाजी काळगे आपल्याला दिल्लीतून खेचून आणतील यात शंका नाही. म्हाडा अंतर्गत मिळालेल्या घरांच्या कर्ज परतफेड व त्यावरील व्याज याचा प्रश्न मंत्रालय स्तरावरील असून तो सोडवण्यासाठी नक्की प्रयत्न केले जातील असे आश्वासन दिले.

काँग्रेस सरकार राज्यात जसे बदलले तसे आपल्या आयुष्यात देखील बरेच बदल घडून आले ते आपण जाणून आहेतच. आता पुन्हा पूर्वीचे चांगले दिवस आणायचे असतील तर सुशिक्षित, उच्चविद्या विभाषित, संवेदनशील, समाजाशी नाळ जोडलेले असे व्यक्तिमत्त्व डॉ. शिवाजी काळगे असून ते आपल्याला २४ तास ३६५ दिवस ५ वर्ष उपलब्ध राहतील. त्यामुळे आपण त्यांना प्रचंड मतांनी निवडून द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित महाराणा प्रताप नगर (म्हाडा कॉलनी) परिसरातील नागरिकांना करीत सर्वाधिक मताधिक्य बाभळगाव मधून मिळेल असा विश्वास माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी व्यक्त केला.

यावेळी प्रास्ताविक करताना एम.के.इनामदार यांनी बोलतांना लातुर लोकसभा मतदार संघातील आपले उमेदवार डॉ. शिवाजी काळगे आपल्या भावना समजून त्या सोडवण्यासाठी नक्की प्रयत्न करतील आणि त्यासाठी आपण लातुर लोकसभेचे महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार करूया असे आवाहन केले. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष किरण जाधव, लातूर तालुकाध्यक्ष सुभाष घोडके, चेअरमन सर्जेराव मोरे, व्हा.चेअरमन समद पटेल, सभ्झापती जगदिश बावणे, व्यंकटेश पुरी, संगीता पतंगे, गणेश एसआर देशमुख, इम्रान सय्यद, विकास कांबळे, प्रवीण पाटील, एम. के. इनामदार, तुकाराम आडे, राजकुमार पवार, माधव गंभीरे, युसूफ शेख, सत्तार, एन ए इनामदार, युसुफ पठाण, शिवाजी देशमुख यांच्यासह युवक, जेष्ठ नागरिक, महिला भगिनी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चित्रकला शिक्षक महादेव खळुरे यांचा सन्मान



अहमदपूर : पुणे जिल्हा कलाशिक्षक संघाच्यावतीने घेण्यात आलेल्या एकदिवसीय जिल्हास्तरीय कलाशिक्षक कृतीसत्र कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे राज्य अध्यक्ष शरद गोसावी यांच्या हस्ते दि. ३ रोजी यशवंत विद्यालय अहमदपूर येथील क्रांतीज्योती सावित्रीमाई राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त कलाशिक्षक महादेव खळुरे यांचा गौरव करण्यात आला. कलाक्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल तसेच आकाशवाणी, स्वीप जनजागृती, तंबाखूमुक्त शाळा अभियान, इंधन संवर्धन यासारख्या अनेक राष्ट्रीय व सामाजिक कार्यात विशेष योगदान दिल्याबद्दल महादेव खळुरे यांचा - दि. ३ एप्रिल रोजी डी. वाय. पाटील सभागृह, प्राधिकरण, आकुर्डी येथे राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी, सुप्रसिद्ध जेष्ठ अभिनेत्री पद्मश्री नयना आपटे, डी. वाय. पाटील कला - महाविद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कलवले,प्रो. शंकर आडेराव, डॉ. वराहूल वेलदोडे, प्रो.पल्लवी पांढरे, डॉ.नितीन तावरे, पुणे जिल्हा कलाशिक्षक संघ संस्थापक हुसेन खान, राज्य उपाध्यक्ष किरण सरोदे, अध्यक्ष मिलिंदा शेलार यांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा संपन्न झाला.

याबद्दल सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार शिवाजी पालेपाड, लातूर बोर्डाचे सचिव सुधाकर तेलंग, डायटचे प्राचार्य डॉ. भगिरथी गिरी, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे. टागोर शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. अशोकराव प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक राजकुमार घोटे, पर्यवेक्षक आशोक पेद्देवाड, रामलिंग तत्तापुरे, कलाध्यापक दिपक जगताप, श्रीमती भारती भगत यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे १६ एप्रिलपासून विविध खेळांचे मोफत उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर

लातूर : क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि लातूर जिल्हा क्रिडा प्रशिक्षण केंद्राच्यावतीने क्रीडा संघटना, अकॅडमीमार्फत १६ ते २५ एप्रिल, २०२४ या कालावधीत विविध खेळांचे सर्व वयोगटातील विद्यार्थी खेळाडूंसाहती मोफत क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर सन २०२४-२०२५ च्या स्पर्धेच्या पूर्वतयारी लक्षात घेवून घेण्यात येणार आहे. तसेच शिबीरामध्ये शासनाचे क्रीडा मार्गदर्शक तसेच संघटना, इतर अकॅडमीचे तज्ज्ञ क्रीडा मार्गदर्शक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू व तज्ज्ञ पदाधिकारी यांच्याद्वारा खेळनिहाय तंत्रशुध्द प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

जिल्हा क्रीडा संकुल येथे क्रिकेट, खो-खो, कुस्ती, मैदानी, रायफल शुटींग, लॉन टेनिस, जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब, योगा, व्हॉलीबॉल, फुटबॉल, बॅडमिंटन, बॉक्सिंग, ज्युदो, कराटे, स्केटींग, बेसबॉल, सॉफ्टबॉल इत्यादी खेळांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच अहमदपूर येथे तलवारबाजी, सायकलिंग, शुटिंग बॉल, रग्बी, आट्यापाट्या, कबड्डी, बास्केटबॉल, हॅण्डबॉल, फ्लोअर बॉल इत्यादी खेळांचे, उदगीर येथे फुटबॉल, व्हॉलीबॉल, तर मुरुड येथे वुशु., व्हॉलीबॉल, बॉक्सिंग, क्रिकेट, बॅडमिंटन इत्यादी खेळांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षण शिबीर नि:शुल्क असून विद्यार्थी, खेळाडू यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथे क्रीडा मार्गदर्शक जयराज मुंडे (भ्रमणध्वनी क्र. ८२७५२७३९१७) आणि चंद्रकांत लोदगेकर (भ्रमणध्वनी क्र. ९८३४९८८२३९) यांच्याकडे १५ एप्रिल, २०२४ पर्यंत आपली नाव नोंदणी करावी. जिल्ह्यातील विविध शाळेतील क्रीडा शिक्षक, मुख्याध्यापक व पालक यांनी जास्तीत जास्त मुलांना या उन्हाळी प्रशिक्षण शिबीराचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.

# लोकसभा सार्वत्रिक निवडणूक मतदानादिवशी जिल्ह्यातील आठवडी बाजार राहणार बंद

लातूर : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर लोकसभा मतदार संघात मंगळवार, ७ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा. तसेच मतदान शांततेत पार पडावे, यासाठी जिल्ह्यात ७ मे, २०२४ रोजी भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले आहेत. या दिवशीचा आठवडी बाजार इतर दिवशी भरविण्यात येणार आहे. मार्केट एड फेअर क्ट १९८२ चे कलम ५ (अ) मधील तरतुदीनुसार पणन संचालक यांनी दिलेल्या मान्यतेनुसार हे आदर्श निर्गमित करण्यात आले आहेत.

मंगळवार, ७ मे २०२४ लातूर तालुक्यातील मुरुड, औसा तालुक्यातील भादा आणि तावशीताड, रेणापूर तालुक्यातील भाकरंबा, निलंगा तालुक्यातील माकणी थोर, चिंचोली (सा), चिंचोली (भं) आणि शिरोळ (वां), शिरुर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ व हिसामाबाद, अहमदपूर तालुक्यातील हाडोळती, चाकूर तालुक्यातील नळेगाव, जळकोट तालुक्यातील अतनुर या ठिकाणी होणारे आठवडी बाजार ७ मे २०२४ ऐवजी इतर दिवशी भरविण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केले आहेत.

# आपले प्रश्न सोडवण्यासाठी आपल्यातील एक उमेदवार म्हणून मला काम करण्यासाठी विजयी करावे- डॉ.शिवाजी काळगे




डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, लातुर लोकसभेचा उमेदवार आणि मतदान संघातील मतदार यांची भेट व्हावी परिचय व्हावा यासाठी ही सुसंवाद बैठक होत आहे. या माध्यमातून मतदार आणि उमेदवार यांच्यातील एक नाते निर्माण होते आणि हे आपले नाते वृद्धिंगत व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. आपले प्रश्न आजही १० वर्षानंतर प्रलंबित आहेत आणि आपले हे प्रश्न सोडवण्यासाठी आपल्यातील एक उमेदवार म्हणून मी आपल्या समोर असून आपल्या सामाजिक कार्य, जनतेप्रती असलेला प्रामाणिकपणा यावर मताचे दान देऊन मला विजयी करावे अशी विनंती केली.






# मनपा अंतर्गत कार्यरत ३०५ अधिकारी व कर्मचारी यांनी घेतला सर्व रोग निदान शिबीराचा लाभ

लातूर : लातूर शहर महानगरपालिका, लातूर अंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी दि.५ एप्रिल २०२४ वार शुक्रवार रोजी सर्व रोग निदान शिबीर आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये एकुण ३०५ अधिकारी व कर्मचारी यांना विशेष तज्ञामार्फत सेवा देण्यात आली.




मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या संकल्पनेतून तसेच उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, उपायुक्त शुभम क्यातमवार, मुख्य लेखा अधिकारी रावसाहेब कोलगणे यांच्या सुचनेनूसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सर्व रोग निदान शिबीर राबवण्यात आले. सदरच्या शिबीरामध्ये आरोग्य तपासणी सोबत कर्मचा-यांचे आयुष्मान कार्ड व ABHA कार्ड नोंदणी करण्यात आली. तसेच २० अधिकारी/कर्मचारी यांनी रक्तदान देखील केले.

शिबीर यशस्वी होण्यासाठी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ.रामेश्वर कलवले, शहर लेखा व्यवस्थापक शिवकुमार तेली, तसेच डॉ. रमेश बगडे, डॉ. रोंगे, डॉ.बनसोडे, डॉ.स्वामी, डॉ. प्रेरणा जाधव, डॉ. श्रीकांत फड, डॉ.सुब्बाराव, डॉ. नितीन बर्डे, डॉ. निलेश कंदे, डॉ. अतिया सय्यद, श्री पार्श्वनाथ पाटील, आतिश सुळ, मंगेश शिरसाठ, बब्रुवान गुंजोटे, सुरेंद्र कांबळे आदींनी परिश्रम घेतले.

शिक्षण महर्षी, ज्येष्ठ व्यक्तिमत्व सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते श्री केदारी सावळे गुरुजी यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा आपले पुढील आयुष्य निरोगी दीर्घायुषी जावो ही

**सदिच्छा !**




: शुभेच्छूक :

खबर से हकीकत तक वृत्तपत्र आणि शेरखाने परिवार, लातूर

# श्री तुळजाभवानी मंदिराचे आपत्ती सुरक्षा प्रशिक्षण






तुळजापूर(प्रतिनिधी): श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेण्यासाठी जगभरातून भाविक मोठ्या प्रमाणात येत असतात. त्यात विविध धार्मीक उत्सव होतात. भाविकांची गर्दी पहाता सुरक्षा रक्षकांची गरज असते. अशा प्रसंगी प्रशासन स्तरावर सुरक्षा पुरविली जाते.

या माध्यमातून जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर व्यवस्थापन तथा तहसीलदार माळी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध संघटना, कंपन्या, सेवाभावी संस्था सुरक्षेच्या माध्यमातून सेवेचे कार्य केले जाते. श्री तुळजाभवानी माता हे सर्वांची कुलदेवता आहे. यात मोठ्या प्रमाणात बीव्हीजी ग्रुप हे सुरक्षेचे कार्य करते. बीव्हीजी ग्रुपचे सुरक्षा रक्षक यांना श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान तर्फे वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते.

त्यात गर्दीचे व्यवस्थापन, प्रथमोपचार, अग्नीशमन, विमोचनाच्या पध्दतीने, कृत्रीम शोषण पध्दती, स्ट्रेचर, लोडींग व वहन पध्दती अशा विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले गेले.

यात जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, सुरक्षा रक्षक विभाग, मंदिर संस्थानचे प्रशासन विभाग या सर्वांचे अधिकारी, कर्मचारी वर्ग बीव्हजी ग्रुपचे येवले, सुपरवायझर बाळासाहेब बागल, कमलाकर पवार, अनिल लोखंडे, सचिन पवार, रोहित जवळगेकर यांचे सर्व कामगार, कर्मचारी, सर्व सुरक्षा रक्षक या सर्वांनी मेहनत घेवून थरारक प्रकारचे प्रशिक्षण घेतले.

# नवी मुंबई महावितरणमध्ये दुसरा क्रमांक

## ६० दिवसात ६४ कोटी वसूल करून सहाय्यक अभियंत्याने केली दमदार कामगिरी



नवी मुंबई : ऐरोली महावितरण विभागातर्फे सहाय्यक अभियंता यांनी सेवा करीत असताना कर्तव्याची जाण ठेवून अविरत सेवा कर्तृत्वाच्या माध्यमातून मार्च अखेर वसुलीचे टार्गेट पुर्ण ऐरोली विभागाचे सहाय्यक अभियंता रत्नदिप कटके व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष कौशल्य वापरून ग्राहकांना विश्वासात घेवून ऊर्जेचे महत्व पटवुन देण्यात व वसुली करण्यात यशस्वी झाले आहेत.

त्यांचा संपूर्ण कर्मचारी वर्ग यशाचे मानकरी ठरलेले सहाय्यक अभियंता रत्नदिप कटके यांना सन्मानचिन्ह देवून त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांनी केलेल्या या कार्याबद्दल त्यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

# ज्ञानेश्वरच्या प्राचार्यपदी मीना नरहरे



लातूर : लातूर येथील शाहु चौक भागातील लातूर एज्युकेशन सोसायटी लातूर संस्थेच्या ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री सोपानराव वाघमारे हे नुकतेच नियत वयोमानानुसार ३१ मार्च २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या जागी उपप्राचार्य असलेल्या श्रीमती मीना नरहरे यांना १ एप्रिल २०२४ रोजी प्राचार्यपदी नियुक्ती देण्यात आली आहे. सोबत यावेळी उपप्राचार्यपदी श्री संजय मलवाडे यांची नियुक्ती करण्यात आली तर ज्येष्ठ पर्यवेक्षक पदी श्री माधव क्षीरसागर व हणमंत बैनगीरे यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

याप्रसंगी संस्थेचे संचालक प्रकाश शिंगडे, सहसचिव विठ्ठलराव इगे, कार्यालयीन अधीक्षक सुभाष कोरे, अजय आरदवाड, सेवानिवृत्त कर्मचारी, माजी प्राचार्य सुधीर चेरेकर, सेवानिवृत्त कला शिक्षक शिरीषकुमार शेरखाने यांच्या उपस्थितीत श्रीमती मीना नरहरे यांना पदभार देण्यात आला. तर या देण्यात आलेल्या पदोन्नतीबद्दल त्यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे. याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, कार्यालयीन प्रशासकीय अधिकारी तथा विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्हिडीएफ स्कूल ऑफ फार्मसीच्या प्रा.मोहिनी साळुंके-वाकुरे यांना पीएचडी प्रदान



लातूर : विलासराव देशमुख फाऊंडेशन संचलित स्कूल ऑफ फार्मसी लातूर या महाविद्यालयात कार्यरत प्राध्यापिका मोहिनी साळुंके-वाकुरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून पीएचडी प्रदान केली आहे. प्रा. मोहिनी साळुंके यांनी एक्सप्लोरेशन ऑफ अँटिकॅन्सर बायोऍक्टिव्ह कंपाऊंडस फ्रॉम मरिन मॅक्रोफ्लोरा हा शोधनिबंध डॉ. प्रवीण वक्ते, प्राध्यापक, युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ केमिकल टेकनॉलॉजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनानुसार सादर केला होता.

कर्करोग या आजारावरील उपचाराकरिता निसर्ग निर्मित नवीन रासायनिक संयुगे शोधून त्याचा वापर करण्याकरिता सदरील संशोधन उपयुक्त ठरणारे आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होतं आहे. संस्थेचे प्रमुख माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार श्री. अमित विलासराव देशमुख, सौ. अदिती अमित देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी कौशल पौराना, विश्वस्त श्री. ऍड. किरण जाधव, ऍड. समद पटेल, श्री. विजय देशमुख, श्री. रवींद्र काळे, सीए श्री. रुषिकेश पाटील, प्राचार्य डॉ. बी. एस. वाकुरे, प्राचार्य डॉ. एम. व्ही. बुके, प्राचार्य श्री. राजकुमार साखरे व सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रा. मोहिनी साळुंके-वाकुरे यांचे अभिनंदन केले आहे.

# ज्ञानप्रकाशच्या दोन विद्यार्थ्यांची 'नवोदय' साठी निवड




लातूर : ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राच्या इयत्ता पाचवी वर्गात शिकणाऱ्या दोन विद्यार्थ्यांची जवाहर नवोदय विद्यालय, लातूर येथे इयत्ता सहावीच्या प्रवेशासाठी निवड झाली आहे. आरुष बालाजी शेळके व गार्गी आरडले या दोन्ही विद्यार्थ्यांचे ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राचे प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे, मुख्याध्यापिका व संचालिका सविता नरहरे, पर्यवेक्षक अशोक गुरदाळे, विभाग प्रमुख माधवी मिरजकर आणि मार्गदर्शक संपदा पांडे व वसुधा हुंडेकर सोबतच सर्व शिक्षकांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले व यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मनोज सहदेव अकॅडमीत बक्षीस वितरण



लातूर : शहरातील अंबाजोगाई रोडवरील मनोज सहदेव अकॅडमीत आंतरराष्ट्रीय रंगोत्सव स्पर्धेच्या अंतिम फेरीचे बक्षीस वितरण शनिवारी झाले. याप्रसंगी संस्था सदस्य प्रवीण राठी, अध्यक्ष गिरीश सहदेव, मुख्याध्यापक विजय सहदेव आदि उपस्थित होते. विद्यार्थ्यांना रंगभरण, कार्टुन मेकींग, स्केचिंग, सुंदर हस्ताक्षर आदि विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून यश मिळविले. त्यामुळे पदक मिळाले आहे. अर्ट मेरिद अवॉर्ड पवन जांगिड याला तर द्वितीय पारितोषिक अमृता नागरगोजे हिने मिळविले.

तसेच आरव सुर्यवंशी, गौरी परांडे, संबोधी कांबळे, संस्कृती पाटील, नाझिया शेख, जान्हवी चौरे, कृतिका लवेकर, तेजस्विनी पलसे, वैष्णवी पोद्दार, प्रांजल केंद्रे, कनक वाघमारे आदि विद्यार्थ्यांनी पदके प्राप्त केली. चित्रकला क्षेत्रात शाळेने उत्कृष्ट कार्य केल्याने मुख्याध्यापकांना प्रेरणा चषक देण्यात आला. तसेच गणेश म्हेत्रे यांचाही चषक देवून गौरव करण्यात आला. यावेळी शिक्षक, विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.

# कबीरवाडी येथे विवाह सोहळ्यात गुणवंत मिसलवाड यांनी केली मतदान जनजागृती



नांदेड- भारतीय लोकशाहीला बळकट करण्यासाठी मतदानाची टक्केवारी वाढवून लोकशाही मार्गाने देशाचा विकास घडविण्यासाठी तमाम नागरिकांनी निर्भयपणे मतदान करणे आवश्यक असून जनतेमध्ये मतदानाचे हक्क व अधिकार याविषयी जागरुकता निर्माण होण्यासाठी केंद्र व राज्य शासन विविध पातळीवर विविध माध्यमातून मतदारांमध्ये जास्तीत जास्त मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आवाहन करीत असते.

नुकतेच नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा.श्री. अभिजीत राऊत यांनी शुभमंगल विवाह सोहळ्यामध्येही मतदान करण्याची शपथ घेण्याचे आवाहन केले आहे, त्या अनुषंगाने मौजे कबीरवाडी ता. देगलूर येथे दि. ३ एप्रिल २०२४ बुधवार रोजी मिसलवाड परिवार- बोईनवाड परिवार यांचा शुभविवाह सोहळा पार पडला. या लग्न समारोह शुभविवाह सोहळा कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करतानाच या विवाह सोहळ्यामध्ये एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी वधुवरांना शुभाशीर्वाद देण्यासाठी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवर वऱ्हाडी पाहुणे मंडळींना जास्तीत जास्त मतदानाचा हक्क बजावून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मतदान करण्याची सामूहिकरित्या शपथ (प्रतिज्ञा ) देऊन मतदान जनजागृती केली.

यावेळी शुभविवाह मंचावर कबीरवाडीचे सरपंच सौ. मथुराबाई धोंडीबा शिंदे, उपसरपंच सौ. रतुबाई पांडूरंग मिसलवाड, पोलीस पाटील सौ. मिनाबाई राजकुमार मिसलवाड, ग्रामसेवक पांडूरंग कल्याणपाड, पांडूरंगराव मिसलवाड, काळबा बोईनवाड, किसनदेव जोशी वझर, धोंडोपंत महाराज काळे, शिक्षक बालाजी येरगट्टे, गोविंद मचकुरी, माजी सैनिक धोंडीबा भुतापल्ले, बीएसएफ जवान नामदेव लोणीकर, रघुनाथ माटुरे, पंढरीनाथ मिसलवाड, मच्छिंद्र मिसलवाड आदींसह कबीरवाडी येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मा. श्री. गुणवंत एच. मिसलवाड म्हणाले की, सर्व नागरिकांनी निवडणूक कोणतीही असो निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावून मतदानाची टक्केवारी वाढवून मतदानाचा उत्सव साजरा करून भारतीय लोकशाही बळकट करावी असे आवाहन केले.

# आजचे विद्यार्थी भावी शास्त्रज्ञाची निर्मिती-डॉ.कोमल गोमारे



लातूर : जैवतंत्रज्ञान विभाग नियमितपणे विविध वैज्ञानिकांची जयंती साजरी करतो. त्यामगचा उद्देश हा आहे की, विद्यार्थ्यांना वैज्ञानिकांच्या कार्याची, त्यांनी केलेल्या प्रयत्नांची जाणीव व्हावी व त्यातून विज्ञाननिष्ठा निर्माण व्हावी. तसेच संशोधकांचे कार्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान आहे, असे जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ.कोमल गोमारे यावेळी म्हणाल्या.

दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०५ एप्रिल २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्यावतीने वैज्ञानिक सॅम्युअल केट प्रेस्कॉट यांची १५२ वी जयंती साजरी करण्यात आली. वैज्ञानिकांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यास अभिवादन करण्याचा हा उपक्रम दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागातर्फे राबवला जातो. दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे, एम.एससी, बीटी प्रथम वर्षातील निलोफर पठाणव एम.एस्सी.बीटी द्वितीय वर्षातील विद्यार्थी प्रतिनिधी वृषाली पवार यांनी कार्यक्रमाची सुरूवात वैज्ञानिकांच्या प्रतिमेस वंदन करून केली.

वैज्ञानिक सॅम्युअल केट प्रेस्कॉट यांची विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील कारकीर्दी वृषाली पवार यांनी सांगितली. सॅम्युअल केट प्रेस्कॉट हे अमेरिकन अन्नशास्त्रज्ञ आणि सुक्ष्मजीवशास्त्रज्ञ होते. जे अन्न सुरक्षा, अन्न विज्ञान, सार्वजनिक आरोग्य आणि औद्योगिक सुक्ष्मजीवशास्त्राच्या विकासात गुंतले होते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात, युनायटेड स्टेट्सचे सॅम्युअल सी.प्रेस्कॉट आणि विल्यम अंडरवुड यांनीकॅन केलेला पदार्थ निर्जंतुक करण्यासाठी विशिष्ट वेळ-तापमान गरम करण्याच्या आवश्यकतांचे वर्णनकरून वैज्ञानिक आधारावर कॅनिंग सेट केले.




लातुर : दुसरे वर्ष भीमफेस्टीवल निमीत्त उद्या लातुर शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते संविधान चौक,बार्शीरोड लातुर मॅरॅथॉन दौड स्पर्धा.चलो भिमरमाईके सच्चे विचार दिल में लेके दौड में शामील हो जाईये लातुरकरांतर्फे अतीश आगळावेगळा आणि लातुर पॅटर्नला साजेसा भीमफेस्टीवल-२०२४ यंदाही परदेशी नोकरीला स्थाईक असलेले डॉ.विजयकुमार अजनीकर हे खास भीमफेस्टीवलसाठी वेळ काढुन, पदरमोड करत लातुरकरांना प्रेरीत, उत्साहीत करण्याची धडपड करतात.ते स्नेही जनांना,बहुजन प्रेमी,मित्रपरिवांरांना कृतीशील भिमजयंती कशी असावी याचे ऊत्तम ऊदाहरण स्थापण करण्याचा प्रयत्न होत आहे.

यासाठी हा भीमफेस्टीवलचा ऊत्सव समस्त लातुरकरांचा आहे.चला सहभागी होऊन भारतीय संविधान शिल्पकार बोधीसत्व,परमपुज्य विश्वरत्न, ऊपेक्षितांचा महानायक प्रज्ञासुर्याला वंदन करण्यासाठी मर्मॅरॅथॉनमध्ये ऊद्या दि.९/४/२०२४ मंगळवारी सकाळी ठिक ६:००वाजता सहभागी होऊयात.जयभिम!नमो बुद्धाय!!जय जय रमाई!!!भीमजयंतीच्या सर्वांना लाख लाख मंगल कामना

# विज्ञानाची सकारात्मक स्पंदने चहू दिशांनी पसरावी-डॉ.संगपाल क्षीरसागर

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात वैज्ञानिक फेडोर फेलिक्स कोनराड,जेम्स ड्यूई वॉटसन व एडमंड हेन्री फिशर यांची जयंती साजरी



लातूर - जैवतंत्रज्ञान विभागातर्फे विज्ञान विषयासाठी समर्पित अशा उपक्रमातून विज्ञानाची सकारात्मक स्पंदने चहू दिशांनी पसरली जातील,ज्यामुळे विद्यार्थी व सामान्य नागरिकांना विज्ञानाचे महत्त्व कळेल,असे डॉ. संगपाल क्षीरसागर यावेळी म्हणाले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग उल्लेखनीय असून महाविद्यालय त्यांना अशा प्रकारे व्यासपीठ उपलब्ध करून देते त्याबद्दल त्यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०६ एप्रिल २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने वैज्ञानिक फेडोर फेलिक्स कोनराड,जेम्स ड्यूई वॉटसन व एडमंड हेन्री फिशर यांची जयंती साजरी करण्यात आली. राजर्षी शाहू महाविद्यालयातील डॉ. संघपाल क्षीरसागर व डॉ.कोमल गोमारे यांनी कार्यक्रमाची सुरुवात वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली. वैज्ञानिक एडमंड हेन्री फिशर यांची पवन बिराजदार (एम.एस्सी. बीटी.व्दितीय वर्ष), फेडोर फेलिक्स कोनराड यांची प्रतीक्षा होळकर (एम. एस्सी. बी टी. प्रथम वर्ष) जेम्स ड्यूई वॉटसन यांची सोनकांबळे सुहास (एम.एस्सी. बीटी.प्रथम वर्ष) यांनी विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील कारकीर्द सांगितली.

जेम्स ड्यूई वॉटसन हा एक अमेरिकन आण्विक जीवशास्त्रज्ञ, अनुवंशशास्त्रज्ञ आणि प्राणीशास्त्रज्ञ आहे. १९५३ मध्ये, त्यांनी डीएनए रेणूच्या दुहेरी हेलिक्स रचना प्रस्तावित करणारा शैक्षणिक पेपर फ्रान्सिस क्रिक यांच्यासोबत सह-लेखन केले. वॉटसन, क्रिक आणि मॉरिस विल्किन्स यांना न्यूक्लिक सिड्सची आण्विक रचना आणि सजीव सामग्रीमधील माहिती हस्तांतरणासाठी त्याचे महत्त्व यासंबंधीच्या शोधांसाठी १९६२ चा फिजियोलॉजी किंवा मेडिसिनमधील नोबेल पारितोषिक देण्यात आले. एडमंड हेन्री फिशर हे स्विस-अमेरिकन बायोकेमिस्ट होते.प्रथिने सक्रिय करण्यासाठी आणि विविध सेल्युलर प्रक्रियांचे नियमन करण्यासाठी प्रत्यावर्ती फॉस्फोरिलेशन कसे कार्य करते याचे वर्णन करण्यासाठी त्यांना आणि त्यांचे सहकारी एडविन जी. क्रेब्स यांना १९९२ मध्ये शरीरविज्ञान किंवा वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले. २००७ ते २०१४ पर्यंत, ते जागतिक सांस्कृतिक परिषदेचे मानद अध्यक्ष होते. २०२१ मध्ये वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांच्या मृत्यूच्या वेळी, ते सर्वात वृद्ध नोबेल पारितोषिक विजेते होते.

फेडोर फेलिक्स कोनराड एक जर्मनबायोकेमिस्ट होते. १९६४ मध्ये त्यांनी कोनराड ब्लॉच यांच्या समवेत कोलेस्ट्रॉल आणि फॅटी ऍसिड चयापचय यंत्रणा आणि नियमन यासंबंधीच्या शोधांसाठी फिजिओलॉजी किंवा मेडिसिनमध्ये नोबेल पारितोषिक जिंकले, ते म्युनिकमधील मॅक्स-प्लँक इन्स्टिट्यूट फॉर सेल्युलर केमिस्ट्रीचे संचालक होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड व उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या जैवतंत्रज्ञान मंचचे सदस्य प्रा.स्वरूप गावकरे व प्रा. श्रीनिवास कुलकर्णी तसेच जैवतंत्रज्ञान विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी प्रकाशक, मालक, संपादक शिरीषकुमार तुकाराम शेरखाने यांचेकरिता मॅजिक पब्लीकेशन, १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून ऋतूप्रेम, मुक्ताई नगर,एस.टी.वर्कशॉप पाठीमागे, अंबाजोगाई रोड, लातूर. जि.लातूर ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादक : शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो.९०४९८४४४१२ (टिप : सर्व वाद लातूर न्यायकक्षेत) RNI No. : MAHMAR/2023/86200

PRINTED BY GHONE NARSHINHA PANDURANG PUBLISHED BY, OWNED BY & EDITED BY SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE, PRINTED AT MAGIC PUBLICATION, 10 MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, TQ & DIST. LATUR - 413512
& PUBLISHED AT RUTUPREM, MUKTAINAGAR, AMBAJOGAI ROAD, BEHIND S.T.WORK SHOP LATUR DIST. LATUR - 413512 (MAH.) * EDITOR : SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE, MOB. 9049844412 RNI No. : MAHMAR/2023/86200